# प्रेसनोट

## खंडणी विरोधी पथकाकडून खडकी भागात सराईत गुन्हेगाराकडुन एक पिस्टल व दोन काडतुस जप्त

दि. २२/०७/२०१७ रोजी खंडणी विरोधी पथकाचे अधिकारी व कर्मचारी खडकी पोलीस स्टेशनचे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना खंडणी विरोधी पथकातील पोलीस नाईक सचिन अहिवळे यांना एक इसम एक पिस्टल घेवुन बोपोडी पुलाखाली गांधीनगर झोपडपट्टीजवळ, बोपोडी, पुणे येथे उभा असल्याची माहिती मिळाल्याने खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव यांचे दिमतीत खंडणी विरोधी पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक विठ्ठल शेलार व स्टाफने सापळा रचुन इसम नामे विकी शंभुसिंग उर्फ शंभुलिंग सुतार वय २३ वर्षे रा. ज्योतीबानगर, आझादनगर, आझाद कॉलनी घर नं. १०, साईलिला अर्पाटमेंट काळेवाडी, पुणे याला पकडून त्याचेकडून एक पिस्टल व दोन जिवंत काडतूसे असे किं.रुपये २०,२००/- चे अग्निशस्त्र जप्त करण्यात आले असून सदरबाबत खडकी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपीवर हिंजवडी व वाकड पोलीस स्टेशनला वाहनांची जाळपोळ व मारामारी चा गुन्हा दाखल आहे.

**सदरची कारवाई ही मा. प्रदीप देशपांडे अपर पोलीस आयुक्त सो, गुन्हे, पुणे., मा.पंकज डहाणे पोलीस उप-आयुक्त सो,गुन्हे पुणे व मा.सुरेश भोसले सहा.पोलीस आयुक्त सो,गुन्हे - १ पुणे यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव, सहा. पोलीस निरीक्षक विठ्ठल शेलार व स्टाफ, सचिन अहिवळे, प्रशांत पवार, संतोष मते, शिवानंद बोले, प्रमोद मगर,मंगेश पवार, भाऊसाहेब कोंढरे, रणजित अभंगे, फिरोज बागवान, एकनाथ कंधारे, हनुमंत गायकवाड यांनी केली आहे.**